॥ श्री ॥

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे



देवी स्कंदमाता
ही हिंदू धर्मातील नवदुर्गांपैकी पाचवी देवी आहे.

अहिल्यानगर | गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये!

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अग्रीम मदतीची घोषणा । ३०५ तालुक्यांत दुष्काळ, सुमारे ६ हजार कोटी रुपये वितरित करण्याचे नियोजन**

**● मुंबई । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सह्याद्री अतिथिगृहावर मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावली. या बैठकीत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम मदत जमा करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना केली. सुमारे एक ते सव्वा कोटी शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळणार असून, त्यासाठी अंदाजे ६ हजार कोटी रुपयांची तरतूद असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वसाधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस दुष्काळ जाहीर केला जातो. मात्र, यंदाची परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळाची आगाऊ घोषणा करण्यात आली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय ऑक्टोबरमध्ये काढण्यात आला आहे.

दिवाळी जवळ आली असताना शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुष्काळ निवारणाची संपूर्ण कार्यवाही दिवाळीपूर्वी पूर्ण करणे कठीण असल्याने मंत्रिमंडळाशी चर्चा करून शेतकऱ्यांना तातडीने प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ही रक्कम दिवाळीपूर्वी थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यात आणखी ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, एकूण ३०५ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांत समावेश झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या तालुक्यांना दुष्काळग्रस्तांसाठी लागू असलेल्या १२ सवलती मिळत राहतील, असे त्यांनी सांगितले. कर्जमाफीची रक्कमही शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा होत असल्याचा दावा त्यांनी केला.

दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र होत असून, पाणीपुरवठ्यासाठी टँकरची संख्या वाढत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मराठवाड्यातील पाणीपातळी तीन मीटरपेक्षा खाली गेल्याचे नमूद करत त्यांनी तेथे गरजेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाल्याची माहिती दिली.

पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे जीपीएस प्रणालीद्वारे ट्रॅकिंग करण्यात येणार आहे. तसेच राज्यात १६ हजार बेकायदा पाणी जोडण्या तोडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.



### आतापर्यंत ३०५ तालुके दुष्काळग्रस्त

- दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये ॲडव्हान्स देणार
- मराठवाड्यात भूजल पातळी ३ मीटरने खालावली, पिण्याच्या पाण्याचे टँकर वाढवणार
- १६ हजार अनधिकृत कनेक्शन कापले
- शैक्षणिक फी माफीच्या जीआरमधून अटी-शर्ती हटवल्या
- वीज बिलांसाठी कोणताही तकादा नाही, अतिउत्साह दाखवल्यास कारवाई
- कर्जवसुलीसाठीही बँकांनी अतिउत्साह दाखवू नये, खासगी बँका, मायक्रो फायनान्स कंपन्यांशी चर्चा करणार
- शेतकऱ्यांनी चारा किंवा चारा लागवड पीकं घ्यावीत, राज्य सरकार तो विकत घेणार.

### मंत्रिमंडळाचे इतर निर्णय

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अभिनंदन. घटनात्मक पदावर राहून सलग पंचवीस वर्षे यशस्वीरित्या जनसेवा केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर.
- शासकीय मालकीच्या छोट्या, स्वतंत्ररीत्या बांधकामास अयोग्य, चिंचोळ्या आकाराच्या, उपयुक्त आकार नसलेल्या, पोहोच मार्ग नसलेल्या भूखंडांच्या वितरणाच्या धोरणात सुधारणा करण्यास मंजुरी. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३७ व ३७ अ मधील तरतुदीत सुधारणा होणार.
- श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगांव यांना मौजे गिरडा येथील यात्रास्थळ विकासासाठी कायमस्वरूपी बांधकाम करण्यास मंजुरी. संस्थानाला यापुर्वीच वृक्षलागवडीसाठी दिलेल्या १९ हेक्टर ६ आर. जमिनीपैकी ३ हेक्टर ८१ आर जमिनीवर बांधकाम करता येणार. यामुळे भाविकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देता येणार.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### रीत

सगळे धावतात
नेमके कुठे ?
पैशाचा बाजार
धोरण आडमुठे
प्रत्येक पाऊल पाहून
ठेवले जाते हित
माल तसा चाल
नव्या युगाची रीत

## SPOT NEWS

### गंगेत बोट बुडून १४ ठार, ६ गंभीर

**● हाजीपूर –** श्राद्धासाठी जाताना गंगा नदीत बोट उलटल्याने १४ जणांचा मृत्यू झाला आहे. तिघांना वाचवण्यात यश आले असून सहा जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हाजीपूर येथे रामपूर श्यामचंद गावाजवळ मंगळवारी रात्री उशिरा ही घटना घडली. मृतांमध्ये १३ लहान मुलांचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच गावक-यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक प्रशासनाला घटनेची माहिती देण्यात आली. प्रशासनाने तात्काळ बचावकार्य सुरू केले. सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. बोटीत २० हून अधिक जण होते. श्राद्ध कार्यक्रमासाठी सर्व जण बोटीतून पलिकडे जात होते. यावेळी बोट अचानक उलटली. बोट दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. लहान मुलांच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### मुस्कान-साहिलला फाशीची शिक्षा; निळा ड्रम हत्याकांड

**● नवी दिल्ली –** मेरठमध्ये प्रियकरासोबत मिळून पती सौरभ राजपूतची हत्या करणा-या मुस्कानला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तिचा प्रियकर साहिललाही न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. शिक्षा सुनावण्यापूर्वी तुरुंगात असलेल्या मुस्कान आणि साहिलला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात आले. मुस्कान रस्तोगी आणि साहिल ढसाढसा रडू लागले. न्यायाधीशांनी मुस्कानला विचारले- तू तुझा पती सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी दोषी आहेस, तुला कोणती शिक्षा हवी आहे? तिने उत्तर दिले माझ्या मुलींची काळजी घेतली जावी. त्यानंतर ती शांत झाली. यानंतर साहिलला हाच प्रश्न विचारण्यात आला, मात्र तो गप्प राहिला. शिक्षेची घोषणा झाल्यानंतर सौरभच्या आईला अश्रू अनावर झाले.

## ‘एमपीएससी’ सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार सौरभ कटियार यांच्याकडे

**● पुणे । वीरभूमी –**

पेपरफुटी प्रकरणानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या सचिवदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आल्यानंतर सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला आहे. तर विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार रजेवर गेल्याने अध्यपदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य सदस्याकडे सोपविण्याची प्रक्रिया सुरु आहे.



लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारने न्या. दिलीप भोसले यांची समिती गठीत केली असून त्यांना चौकशीसाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. राज्यपालांच्या मान्यतेनंतर चौकशी समितीची अधिसूचना निर्गमित होणार असून त्यानंतर समितीचे कामकाज सुरू होईल. समितीचा अहवाल आणि त्यावरील सरकारचा निर्णय होण्यास लागणारा कालावधी लक्षात घेऊन भीमनवार यांच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य सदस्याकडे सोपविण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणात अध्यक्ष विवेक भीमनवार यांना तूर्त रजेवर पाठवण्यात आले असून याद्वारे पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून निर्माण झालेली कोंडी सोडवण्यात सोमवारी राज्य सरकारला यश आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर, चौकशी पूर्ण होईपर्यंत पदावर कार्यरत न राहता रजेवर जाण्याचा निर्णय भीमनवार यांनी जाहीर केला. आपण संपूर्ण आयुष्यात नैतिकतेला नेहमी प्राधान्य दिले असल्याचे स्पष्ट करत ते रजेवर गेले आहेत.

## १० लाख क्विंटल कांदा एनसीसीएफच्या गोदामात सडवला

**● नाशिक । वीरभूमी –**

दर नियंत्रणासाठी केंद्रीय ग्राहक मंत्रालयासाठी नाफेड, एनसीसीएफने खरेदी केलेला ९.६० लाख क्विंटल कांदा नाशिकमध्ये सडला आहे. उत्कृष्ट दर्जाच्या २३ रुपये प्रतिकिलो या भावाने ११.९० लाख क्विंटलची खरेदी दाखवली होती. एनसीसीएफचा बारा हजार मेट्रिक टन कांदा बाजारपेठेत पोहोचू शकला. सडलेला कांदा खत म्हणून विक्रीस काढला आहे. किलोला दोन ते चार रुपये भाव मिळू शकतो.



कांदा खरेदीतील या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी २९ सप्टेंबरला पणन खात्याने जिल्हाधिका-यांना आदेश दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने चौकशी सुरू केली. या समितीचे सदस्य असलेले प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना २६ ऑक्टोबरपर्यंत सर्व खरेदी केंद्रे आणि वखार महामंडळाच्या गोदामांना प्रत्यक्ष भेटी देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील नाफेडच्या गोदामात सडलेला आणि पूर्णपणे काळा पडलेला कांदा. तळाच्या साठ्याला पाणी सुटल्यामुळे त्याची अस दुर्गंधीही या चाळीत पसरलेली होती. या कांद्यासाठी ठेकेदार संस्थांनी उत्कृष्ट कांद्याचा २३ रुपये प्रतिकिलो भाव मोजला.

# ऊसदरासाठी महामार्ग रोको; आंदोलन सलग दुसऱ्या दिवशीही सुरू!

**कोगनोळी ते हावेरीपर्यंत हजारो शेतकरी रस्त्यावर । राजू शेट्टींचा केंद्र सरकारच्या धोरणांवर निशाणा, अडकलेल्या वाहनचालकांसाठी भोजनाची व्यवस्था**

**● कोल्हापूर । वीरभूमी –**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुकारलेले महामार्ग रोको आंदोलन सलग दुसऱ्या दिवशीही सुरू आहे. पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर कोगनोळीपासून हावेरीपर्यंत हजारो शेतकरी रस्त्यावर ठाण मांडून बसले आहेत. आंदोलनाची भूमिका स्पष्ट करताना संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केंद्र सरकारसोबत चार तास चर्चा करूनही तोडगा न निघाल्याने महामार्ग रोखण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे सांगितले.

काल सकाळी ११ वाजल्यापासून महामार्ग रोखून धरला आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्याबद्दल मी त्यांची माफी मागतो. मात्र, केंद्र सरकारसोबत चार तास चर्चा करूनही काही साध्य झाले नाही. २४ तास उलटूनही निर्णय झालेला नाही. ‘नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही’ या न्यायाने दुर्दैवाने आम्हाला रस्ता रोखण्याचा निर्णय घ्यावा लागला, असे शेट्टी म्हणाले.

महामार्गावर अडकलेल्या वाहनचालकांबाबत संवेदनशीलता दाखवत राजू शेट्टी यांनी स्थानिक शेतकऱ्यांना विशेष आवाहन केले. बाहेरच्या राज्यांतून आलेले अनेक ट्रक आणि कंटेनरचालक महामार्गावर अडकले आहेत. त्यांची उपासमार होऊ देऊ नका. त्यांच्या चहा आणि जेवणाची व्यवस्था करा. स्थानिक पातळीवर व्यवस्था करणे शक्य नसेल, तर संघटनेशी संपर्क साधा; आम्ही शिधा पुरवू, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र आणि कर्नाटकचे आतिथ्य आपण दाखवून दिले पाहिजे, असे आवाहनही शेट्टी यांनी केले.

केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करताना शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांची मागणी सरकारच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक बोजा न टाकणारी आहे. बाजारात ६० रुपयांनी विकल्या जाणाऱ्या साखरेला ५० रुपयांची हमी मिळावी, अशी मागणी त्यांनी मांडली. तसेच इथेनॉल विक्रीतून मिळणारा पैसा साखर कारखान्यांमार्फत शेतकऱ्यांना मिळावा, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

गेल्या वर्षभरात तेल कंपन्यांनी दीड लाख कोटी रुपयांचा नफा कमावल्याचा दावा करत, त्यातील मोठा वाटा इथेनॉलशी संबंधित असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या उत्पादनावर इतर घटक लाभ मिळवत असताना शेतकऱ्यांना मात्र आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. उत्तर प्रदेशचे उदाहरण देत साखरेच्या दरांशी संबंधित आर्थिक व्यवहारांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

शेतकऱ्यांना एकजूट राखण्याचे आवाहन करताना शेट्टी म्हणाले, जोपर्यंत आपल्या शेतात ऊस आहे, तोपर्यंत आपल्याला किंमत आहे. शेतकऱ्यांनी आपला ऊस आणखी आठ ते दहा दिवस शेतातच ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले. नवीन साखरेचे उत्पादन बाजारात आले नाही, तर साखरेचा पुरवठा कमी होऊन केंद्र सरकारवर निर्णय घेण्यासाठी दबाव निर्माण होईल, अशी भूमिका त्यांनी मांडली.



हे ऐतिहासिक आंदोलन असून, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी एकजुटीने लढण्याची हीच वेळ असल्याचे शेट्टी म्हणाले. महामार्ग रोको आंदोलन किती काळ सुरू राहणार आणि केंद्र सरकार ऊस उत्पादकांच्या मागण्यांबाबत कोणता निर्णय घेणार, याकडे शेतकरी, प्रवासी आणि साखर उद्योगाचे लक्ष लागले आहे.

## SPOT NEWS



### अकोलेत गोवंशाच्या अवैध वाहतुकीवर पोलिसांची कारवाई; चौघांवर गुन्हा दाखल

**● अकोले । वीरभूमी-**

तालुक्यातील शिदवड फाटा परिसरात गोवंश जनावरांच्या अवैध वाहतुकीप्रकरणी अकोले पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी गुफरान अजीज सय्यद, अन्वर अजीज सय्यद आणि मुस्ताकिम कुरेशी या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार गोवंश जनावरे आणि महिंद्रा मॅक्स पिकअप वाहन असा एकूण ४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ही कारवाई करण्यात आली. यावेळी पोलिसांनी संबंधित वाहन ताब्यात घेऊन त्यातील चार गोवंश जनावरे जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या चार गोवंश जनावरांची किंमत ४० हजार रुपये, तर महिंद्रा मॅक्स पिकअप वाहनाची किंमत ४ लाख रुपये असल्याचे कागदपत्रात नमूद आहे. त्यामुळे या कारवाईत एकूण ४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९३/२०२६ अन्वये पोलिस कॉन्स्टेबल योगेश जोरगील यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलीस कॉन्स्टेबल विजय फटांगरे, पोलीस कॉन्स्टेबल महेंद्र गुंजाळ आणि पोलीस कॉन्स्टेबल मंगेश बिडवे यांनी सहभाग घेतला.

### धनश्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत जवळे येथे आज रंगणार 'खेळ पैठणीचा'!

**● निघोज । वीरभूमी-**

आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिनाचे औचित्य आणि नवरात्रोत्सवाचे निमित्त साधून ग्रामीण भागातील महिलांच्या मनोरंजनासाठी, बौद्धिक कौशल्यांना वाव देण्यासाठी तसेच कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी 'सन्मान नवदुर्गांचा - उत्सव नारी शक्तीचा' या उपक्रमांतर्गत जवळे येथे प्रथमच भव्य 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. १५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रमात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पत्नी धनश्री विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नवदुर्गांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्य आयोजक व ईरा इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सोनाली सालके यांनी दिली. जवळे येथील महिलांच्या विशेष आग्रहास्तव प्रा. सौ. सोनाली संदीप सालके पाटील यांच्या वतीने या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्रीताई विखे पाटील या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर अध्यक्षस्थानी आ. काशिनाथ दाते हे असतील. प्रसिद्ध 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे निवेदक आकाश बल्ले हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असणार आहेत. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या पाच विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच विजेत्यांना पाच मानाच्या पैठण्या देण्यात येणार असून, सहभागी महिलांसाठीही आकर्षक भेटवस्तूंची व्यवस्था करण्यात आली आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत चालणार असून यामध्ये खेळ, मनोरंजन आणि बक्षीस वितरण होणार आहे.

# आ. आशुतोष काळे यांनी जपला अजितदादांच्या आठवणींचा ठेवा

## 'आठवणीतले दादा' पुस्तकाचे उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवारांच्या हस्ते प्रकाशन

**● कोपरगाव । वीरभूमी-**

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनावर आपल्या कर्तृत्वाचा अजोड ठसा उमटविणारे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाला उजाळा देणाऱ्या 'आठवणीतले दादा' या विशेष स्मरणपुस्तिकेचे प्रकाशन बुधवारी (दि. १४) मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. आमदार आशुतोष काळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या स्मरणपुस्तिकेतून अजितदादांचे नेतृत्व, त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास, विकासाभिमुख विचार, धडाडीचे कार्य आणि कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते यांचा भावपूर्ण शब्दांत वेध घेण्यात आला आहे.



स्व. अजितदादा पवार यांच्या सहवासातील आठवणी, त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण निर्णय, महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि सर्वसामान्य जनतेशी जोडलेली त्यांची नाळ यांचे प्रतिबिंब या स्मरणपुस्तिकेत उमटले आहे. दादांवर प्रेम करणाऱ्या राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या आठवणी आणि अनुभवांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. दादांचे कणखर नेतृत्व, निर्णयक्षमता, विकासकामांबाबतची तळमळ आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम यांचा हा आठवणींचा ठेवा नव्या पिढीलाही प्रेरणा देणारा ठरणार आहे. या पुस्तकाच्या संकल्पनेची मांडणी आमदार आशुतोष काळे यांनी केली असून, देवळाली प्रवरा येथील गणेश आंबीलवादे यांनी संपादनाची जबाबदारी पार पाडली आहे.

प्रकाशनप्रसंगी भावना व्यक्त करताना उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार म्हणाल्या की, आदरणीय दादांचा जीवनप्रवास, त्यांच्या सहवासातील आठवणी, प्रशासकीय कारकीर्द आणि महाराष्ट्रासाठी त्यांनी दिलेले योगदान या पुस्तकाच्या माध्यमातून शब्दबद्ध झाले आहे. दादांच्या कार्याचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रवास पुन्हा एकदा या पुस्तकाच्या माध्यमातून समोर आला आहे. आमदार आशुतोष काळे यांनी मांडलेली ही संकल्पना आणि गणेश आंबीलवादे यांनी केलेले संपादन यामुळे दादांच्या आठवणी जतन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न झाला आहे. त्यांच्या आठवणी अशा स्वरूपात जपल्या जात आहेत, ही माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि जिव्हाळ्याची बाब आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी स्व. अजितदादांशी असलेल्या आपल्या ऋणानुबंधांना उजाळा दिला. ते म्हणाले की, स्व.अजितदादांच्या खंबीर नेतृत्वाखाली काम करताना कोपरगाव मतदारसंघाच्या विकासाला गती देण्याची संधी मिळाली. दादांचा माझ्यावर मोठा विश्वास होता. त्यामुळे माझ्या राजकीय वाटचालीत ते केवळ मार्गदर्शक नव्हते, तर माझ्यासाठी भक्कम आधारस्तंभ होते. त्यांच्या पाठबळामुळे राजकारणात आत्मविश्वास आणि बळ मिळाले, तसेच जनतेच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली.स्व.अजितदादांच्या निधनाने माझ्या राजकीय जीवनातील भक्कम आधारस्तंभ हरपला आहे. त्यांचे नेतृत्व, विकासाची दूरदृष्टी, निर्णयक्षमता आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम सदैव स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. त्यांच्या आठवणी आणि कार्याचा वारसा जतन करण्याच्या भावनेतूनच 'आठवणीतले दादा' या स्मरणपुस्तिकेची संकल्पना पुढे आली, असे आ. काळे यांनी सांगितले.

या प्रकाशन सोहळ्यास राज्याचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे, अन्न व नागरी पुरवठामंत्री ना. छगन भुजबळ, वैद्यकीय शिक्षणमंत्री ना. हसन मुश्रीफ, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, आमदार दिलीप बनकर, श्रीकांत जाधव, सागर भालेराव, महेश गिरमे, स्मरणपुस्तिकेचे संपादक गणेश आंबीलवादे यांच्यासह पक्षातील ज्येष्ठ नेते, मान्यवर आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### आमदार नारायणराव कुचे यांनी चौथ्या माळेनिमित्त घेतले श्री मोहटादेवीचे दर्शन



**● पाथर्डी । वीरभूमी -**

बदनापूर-अंबड विधानसभा मतदारसंघाचे आमदार नारायणराव कुचे यांनी शारदीय नवरात्र महोत्सवातील चौथ्या माळेनिमित्त श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर जाऊन श्री मोहटादेवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवीच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले. श्री मोहटादेवी देवस्थानच्या वतीने त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर भाविकांची मोठी वर्दळ सुरू असून, राज्याच्या विविध भागांतून भाविक देवीच्या दर्शनासाठी येत आहेत. नवरात्रोत्सवाच्या चौथ्या माळेनिमित्त आमदार नारायणराव कुचे यांनी मोहटादेवीचे दर्शन घेतले. यावेळी देवस्थानच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त, जन संपर्क अधिकारी भिमराव खाडे उपस्थित होते. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोहटादेवी गडावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, देवीच्या दर्शनासाठी भाविकांची श्रद्धा आणि उत्साह दिसून येत आहे.

### एस.एस.जी.एम. महाविद्यालयात मातापालक मेळावा उत्साहात संपन्न

**● कोपरगाव । वीरभूमी-**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयात मातापालकमेळावा प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला.



यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी उपप्राचार्य श्री. रवींद्र हिंगे, पर्यवेक्षक श्री. माधव रेवगडे , सायन्सविभाग प्रमुख अण्णासाहेब गोराणे तसेच कला विभाग प्रमुख कलावती देशमुख उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देतानाच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी व प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. अर्जुन भागवत यांनी काळानुसार शिक्षण व्यवस्था बदलली जात आहे, त्यानुसार विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा सहभाग आणि विद्यार्थ्यांची मेहनत या तिन्ही घटकांचा समन्वय महत्त्वाचा ठरतो. . विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे व क्षमतेचे क्षेत्र निवडून त्यामध्ये करिअर घडवावे, असे प्रतिपादन केले.

यावेळी मातापालक प्रतिनिधी सौ. कुंदा जाधव, सौ. कविता मराठे, सौ. चंद्राविकास गव्हाणे. यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसंदर्भात महत्त्वपूर्ण सूचना व अपेक्षा मांडल्या. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वयातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला अधिक प्रभावी दिशा मिळू शकते, असा सूर त्यांच्या मनोगतातून व्यक्त झाला.

या मेळाव्यास पालक, विद्यार्थी तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक माधव रेवगडे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती सुनिता आत्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ विद्या खैरे यांनी केले.

# अमरापूरच्या रेणुकामाता देवस्थानात तिसऱ्या माळेला भाविकांची मांदियाळी

## हिरवाईने नटलेला मंदिर परिसर ठरतोय आकर्षणाचे केंद्र । धार्मिक श्रद्धेसोबत निसर्गरम्य पर्यटनाचाही भाविक घेताहेत आनंद

**● शेवगाव । वीरभूमी-**

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असून, प्रत्येक माळेला भाविकांची संख्या वाढत आहे. साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माहूरगड निवासिनी श्री रेणुकामातेचे श्रीक्षेत्र अमरापूर हे श्रद्धास्थान असल्याने माहूरगड येथे दर्शनासाठी जाणे शक्य नसणारे हजारो भाविक अमरापूर येथे येऊन आईसाहेबांच्या दर्शनाचा लाभ घेत आहेत.

श्रीक्षेत्र अमरापूर येथील रेणुकामाता देवस्थानात माहूरगडाप्रमाणेच आईसाहेबांना दररोज नवीन साडी नेसविण्यात येते. तसेच दररोज पुरणावरणाचा नैवेद्य दाखवून सर्व धार्मिक विधी नियमितपणे पार पाडले जातात. आईसाहेबांच्या दैनंदिन पूजाअर्चेसाठी देवस्थानात तीन निवासी पुजारी आहेत. नवरात्रोत्सवात पाथर्डीचे वेदशास्त्रसंपन्न सचिन देवा देशपांडे, तुषार देवा वैद्य यांच्यासह ११ ब्रह्मवृंदांकडून सप्तशती पाठ आणि अन्य धार्मिक विधी सुरू आहेत.





देवस्थानाला लागून गोशाळा असून, भाविकांच्या निवासासाठी शेजारीच तीन मजली भव्य भक्तनिवास उभारण्यात आले आहे. येथील भोजनगृहात भाविकांसाठी नियमित भंडाऱ्याचे आयोजन केले जाते.

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने देवस्थानाच्या सुमारे साडेपाच एकर परिसरात विविध जातींच्या साडेतीन हजारांहून अधिक वृक्षवेलींची लागवड करण्यात आली आहे. त्यामुळे मंदिर परिसर सध्या घनदाट हिरवाईने नटला आहे. तिसगाव ते पैठण राज्य मार्गालगत अमरापूर येथे असलेल्या या देवस्थानात प्रवेश करताच नयनरम्य हिरवाई आणि पवित्र वातावरणामुळे भाविकांना प्रसन्नतेचा अनुभव येतो.

बुधवारी सकाळी पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, विद्यमान नगराध्यक्ष अभय आव्हाड, शिवसेना नेते रामदास गोल्हार आणि ज्येष्ठ पत्रकार बाळ बोठे यांनी सपत्नीक श्री रेणुकामातेचे दर्शन घेतले.

हजारो वृक्षवेली आणि निसर्गरम्य वातावरणामुळे देवस्थान परिसराला पर्यटनस्थळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे विविध भागांतील भाविक, सामाजिक क्लब, पंचक्रोशीतील शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी, महिला तसेच पुरुषांची भजनी मंडळे सहलीच्या माध्यमातून येथे येत आहेत. रेणुकामातेच्या दर्शनासोबतच निसर्गरम्य परिसराचा आनंद घेत भाविक धार्मिक श्रद्धा आणि पर्यटनाचा दुहेरी अनुभव घेत आहेत.

### श्री रेणुकामातेच्या चरणी सुख-समृद्धीचे साकडे

■ रेणुकाभक्तानुरागी मंगलताई भालेराव, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव आणि जयंती भालेराव यांनी विधिवत श्री रेणुकामातेची पूजा बांधली. यावेळी पर्जन्यराजाने भरभरून बरसावे, शेतशिवार हिरवेगार होऊन धनधान्याची समृद्धी नांदावी, बळीराजा सुखी व्हावा, समाजात बंधुभाव आणि एकोपा वृद्धिंगत व्हावा तसेच संपूर्ण देश सुख, शांती व समृद्धीने संपन्न व्हावा, असे साकडे त्यांनी श्री रेणुकामातेच्या चरणी घातले.

SPOT NEWS

## अर्चना परकाळे यांचा 'आदर्श समाजसेविका' पुरस्काराने गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी –** महिला सक्षमीकरण, स्वयंरोजगार आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साई श्रद्धा फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा अर्चना चंद्रकांत परकाळे यांना स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने 'आदर्श समाजसेविका' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, दुर्बल घटकांतील महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि गरजू महिला व युवतींना स्वावलंबनाची दिशा दाखविणे या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने नुकतेच जिल्हास्तरीय उत्कृष्ट गौरी आरास स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या हस्ते अर्चना परकाळे यांना आदर्श समाजसेविका पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्चना परकाळे या साई श्रद्धा फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. समाजातील दुर्बल आणि गरजू घटकांतील महिलांना सक्षम करून त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी त्या विविध उपक्रम राबवितात. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना शासकीय योजनांची माहिती देणे, त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे आणि विविध शासकीय प्रक्रियांमध्ये मार्गदर्शन करण्याचे कार्य सुरु आहे. अनेकदा आवश्यक कागदपत्रे, दाखले आणि शासकीय योजनांची माहिती नसल्यामुळे गरजू महिला व युवती विविध लाभांपासून वंचित राहतात. ही अडचण लक्षात घेऊन परकाळे या महिलांना आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी मदत करतात.

# देवीच्या दारात भाविकांचा नऊ दिवस 'खडा पहारा'!

### नवसपूर्तीसाठी महिला-पुरुषांचा सहभाग । चार दशकांपासून अखंड सुरू आहे देवीची सेवा



**पाथर्डी । वीरभूमी–** नवसाला पावणारी देवी म्हणून ख्याती असलेल्या श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांची मांदियाळी जमली आहे. मनोकामना पूर्ण झाल्यानंतर देवीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अनेक भाविक नऊ दिवस 'खडा पहारा' देण्याचा नवस पूर्ण करतात. हातात काठी घेऊन रात्रंदिवस देवीच्या चरणी उभे राहणे, नामस्मरण करणे आणि देवीच्या सेवेत तल्लीन होणे, अशा या अनोख्या भक्तिपरंपरेत महिला व पुरुष भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत आहेत.

मोहटादेवी गडावर अनेक वर्षांपासून घटस्थापना, घटी बसणे आणि खडा पहारा देणे अशा धार्मिक परंपरा सुरू आहेत. घटस्थापनेपासून अष्टमीपर्यंत नवरात्रोत्सवाच्या काळात या परंपरांना विशेष महत्त्व असते. देवीच्या कृपेने मनोकामना पूर्ण झाल्याची भावना मनात ठेवून भाविक आपापल्या पद्धतीने नवसपूर्ती करतात. त्यामध्ये खडा पहारा देण्याच्या परंपरेला विशेष स्थान आहे.

खडा पहारा म्हणजे हातात काठीचा आधार घेऊन मंदिर परिसरात उभे राहून देवीचे अखंड नामस्मरण आणि जागर करणे. नऊ दिवस देवीच्या सान्निध्यात राहून तिची सेवा करण्याचा संकल्प भाविक करतात. या काळात उभे राहून पहारा देण्याबरोबरच विश्रांतीच्या वेळी काही भाविक भिंतीचा आधार घेतात. शारीरिक कष्टांची पर्वा न करता देवीप्रती असलेली अढळ श्रद्धा आणि भक्तिभाव जपत भाविक ही परंपरा पार पाडतात.

छत्रपती संभाजीनगर येथील सोनाबाई पाचुंडे आणि त्यांचे पती गजानन पाचुंडे हे गेल्या ४० वर्षांपासून मोहटादेवी गडावर खडा पहारा देण्यासाठी येत आहेत. देवीच्या आशीर्वादाने मुलं कमावती झाली असून सुना-नातवंडांसह कुटुंबात सुख-समाधान नांदत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. देवीची आमच्यावर मोठी कृपा आहे. त्यामुळे दरवर्षी गडावर येऊन खडा पहारा देण्याची सेवा करतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पैठण येथील प्रयागाबाई घायाळ याही गेल्या चार दशकांपासून मोहटादेवी गडावर खडा पहारा देण्यासाठी येतात. अहिल्यानगर येथील कांता वरगळ, गेवराई येथील हिराबाई थोरात, जालना येथील भागीत्रा दौंड आणि छत्रपती संभाजीनगर येथील कुसुम बडे यांच्यासह अनेक महिला या परंपरेत सहभागी होतात. यांपैकी काही महिला आपल्या सासूने सुरू केलेली देवीसेवेची परंपरा पुढे चालवत आहेत.

महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोहटादेवीच्या दर्शनासाठी येणारे भाविक नवरात्रोत्सवात खडा पहारा देत देवीची आराधना करतात. नवसपूर्तीच्या भावनेतून सुरू राहिलेली ही परंपरा केवळ धार्मिक विधीपुरती मर्यादित नसून, अनेक कुटुंबांच्या श्रद्धेचा आणि पिढ्यान्पिढ्या जपलेल्या भक्तिपरंपरेचा भाग बनली आहे.

नऊ दिवस देवीच्या चरणी सेवा अर्पण करत भाविक भक्ती, संयम आणि कृतज्ञतेचा प्रत्यय देतात. त्यामुळे मोहटादेवी गडावरील 'खडा पहारा' ही परंपरा नवरात्रोत्सवातील श्रद्धेचे एक वेगळे रूप म्हणून भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

## नवरात्र हा उपासनेसाठीचा सर्वश्रेष्ठ कालावधी; स्त्रीशक्तीचा सन्मान आणि सद्विचारांचा जागर आवश्यक : रोहिणीताई परांजपे महाराज

**पाथर्डी । वीरभूमी –** नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून स्त्रीशक्तीचा सन्मान, सद्विचारांचा जागर आणि आध्यात्मिक साधनेची घडी अधिक घट्ट करण्यासाठी सामूहिक उपासनेचा निश्चित केलेला कालावधी आहे, असे मत धर्मशास्त्र व संतचरित्राच्या अभ्यासक रोहिणीताई परांजपे महाराज यांनी व्यक्त केले.

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त मोहटादेवी देवस्थानात कीर्तन सेवेसाठी त्या उपस्थित राहिल्या होत्या. त्यापूर्वी देवस्थान समितीच्या स्वागत कक्षात विश्वस्त व विविध मान्यवरांशी संवाद साधताना त्यांनी नवरात्रोत्सवाचे महत्त्व विशद केले.

यावेळी ज्येष्ठ नेते सुनील साखरे, विश्वस्त ॲड. कल्याण बडे, अशोक दहिफळे, शुभम दहिफळे, शशिकांत दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, ज्येष्ठ कार्यकर्ते पोपट बडे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांच्यासह विविध कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

रोहिणीताई परांजपे महाराज म्हणाल्या की, सध्या समाजात अधर्म, अनीती, अनाचार, दुष्ट प्रवृत्ती आणि संस्कारहीनता वाढत असल्याचे चित्र दिसते. भोगवादाकडे समाज आकर्षित होत असताना त्याची पूर्तता करण्यासाठी अशास्त्रीय व अनैतिक मार्गांचा अवलंबही वाढत आहे. धर्माची शिकवण आणि धर्माचरणाशिवाय माणसाचे जीवन अपूर्ण आहे, याची जाणीव असूनही अहंकार व दांभिकपणामुळे माणूस खऱ्या धर्मापासून आणि सत्कर्मापासून दूर जात असल्याचे त्यांनी सांगितले.

हिंदू धर्मातील प्रत्येक सण-उत्सव हा मानवी कल्याण आणि धर्माचरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक उत्सवांना मनोरंजन आणि सामाजिक आनंदोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या मूळ उद्देशाचा विचार करून त्यामागील आध्यात्मिक व सांस्कृतिक संदेश समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

रोहिणीताई परांजपे महाराज म्हणाल्या की, शारदीय नवरात्रोत्सव हा समाजातील दुष्ट प्रवृत्तींवर सुष्ट प्रवृत्तींनी मिळविलेल्या विजयाचे प्रतीक आहे. सुष्ट प्रवृत्तींचे रक्षण करण्यासाठी आदिमाया आदिशक्तीने शस्त्र हाती घेत दुष्ट प्रवृत्तींचा नाश केला आणि मानवसमूहासह सर्व प्राणीमात्रांचे कष्ट दूर केले, अशी हिंदू धर्मपरंपरेतील श्रद्धा आहे.

आदिमाया आदिशक्तीने त्या काळात राक्षसांचा संहार केला नसता आणि देवतांचे रक्षण करण्यासाठी आपल्या शक्तीचा उपयोग केला नसता, तर सृष्टीची स्थिती काय असती, याचा विचार करण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

ज्या घरात, कुटुंबात, समाजात आणि राष्ट्रात स्त्रीचा सन्मान केला जातो, त्या राष्ट्राची प्रगती कोणीही रोखू शकत नाही. त्यामुळे स्त्रीशक्तीच्या सन्मानाचा विचार नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून समाजाने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

हिंदुस्थान आणि हिंदू संस्कृतीवर विविध प्रकारची आव्हाने निर्माण होत असताना देवाधिदेवांची इच्छा तसेच संत-महंतांची साधना व तपशक्ती यांच्या बळावर हिंदू धर्माचे रक्षण होत असल्याचे आपले मत त्यांनी व्यक्त केले. धर्मावर आणि धर्मोपासकांवर संकट आलेल्या वेळी स्त्रीशक्तीने विविध रूपांत प्रकट होऊन त्याचा सामना केल्याची परंपरा हिंदू धर्मात असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्ट आणि धर्मविरोधी प्रवृत्तींच्या निर्दालनासाठी आदिमायेची उपासना करून तिचा आशीर्वाद प्राप्त करण्याचा हा कालावधी आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाचा मूळ उद्देश समजून घेत भक्तिभावाने उपासना करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आ. विवेक कोल्हे यांच्या विशेष पाठपुराव्याला यश; शहा येथील ७ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार

**कोपरगाव । वीरभूमी–** शहा येथे २१.५० एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेला ७ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. शेतकऱ्यांच्या वीजविषयक अडचणी दूर होऊन शेतीपंपांना दिवसा अधिक सक्षम वीजपुरवठा मिळावा, यासाठी आ. विवेक कोल्हे यांनी विशेष पत्रव्यवहार करून सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून, या प्रकल्पामुळे चास उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या सहा गावांतील शेतीपंप ग्राहकांना लाभ होणार आहे.



शहा येथील या सौर ऊर्जा प्रकल्पातून ११ केव्ही वीजवाहिनीद्वारे ३३/११ केव्ही चास उपकेंद्राला सौर वीज उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पातून चासनळी उपकेंद्रांतर्गत मंजूर एजी, वडगाव एजी, बक्तरपूर एजी आणि मोरविस एजी या चार कृषी फीडरना वीजपुरवठा होणार आहे. याचा लाभ चासनळी, मोर्विस, वडगाव, बक्तरपूर, मंजूर आणि हांडेवाडी या गावांतील शेतीपंप ग्राहकांना मिळणार आहे.

शेतीपंप ग्राहकांना दिवसा अधिक सक्षम वीजपुरवठा मिळावा आणि वीजभाराचे व्यवस्थापन सुधारावे, या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आ. विवेक कोल्हे यांनी संबंधित यंत्रणेकडे विशेष पत्रव्यवहार करून या प्रकल्पासाठी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार असून, संबंधित गावांतील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

चास उपकेंद्रांतर्गत एकूण ३ हजार २८८ वीज ग्राहक आहेत. त्यामध्ये १ हजार ६०३ शेतीपंप ग्राहक, १ हजार ४९७ घरगुती ग्राहक, १३४ व्यापारी ग्राहक, २४ औद्योगिक ग्राहक आणि ३० इतर वीज ग्राहकांचा समावेश आहे. या उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रात शेतीपंप ग्राहकांची संख्या मोठी असल्याने शहा येथील सौर ऊर्जा प्रकल्पामुळे कृषी वीजपुरवठ्याच्या नियोजनाला बळ मिळणार आहे. शहा येथील ७ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार असल्याने चास उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या चार कृषी फीडरवरील वीजपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.आ. विवेक कोल्हे यांनी शेतकऱ्यांच्या वीजविषयक अडचणी दूर करण्यासाठी केलेल्या विशेष पत्रव्यवहार आणि पाठपुराव्यामुळे हा प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. त्यामुळे सहा गावांतील शेतीपंप ग्राहकांना दिलासा मिळणार असून शेतकऱ्यांनी या निर्णयाबाबत आ. विवेक कोल्हे यांचे आभार व्यक्त केले आहे.

# अग्रीपंखच्या 'प्रेरणा उत्सवा'त ३२५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

### संधी आहे, पण अभ्यासात सातत्य ठेवा; अधिकारी होण्याची मोठी संधी : तहसीलदार सचिन डोंगरे

**श्रीगोंदा । वीरभूमी–** विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अग्नीपंख फाउंडेशनच्या वतीने श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयाच्या सभागृहात 'प्रेरणा उत्सव' आयोजित करण्यात आला. या सोहळ्यात यूपीएससी, एमपीएससी, एनआयडी, एनआयएफटी, न्यायिक सेवा, एअर फोर्स, बँकिंग, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा तसेच इस्रो सहलीसाठी निवड झालेल्या श्रीगोंदा तालुक्यातील ३२५ विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व मानाची कॅप देऊन गौरव करण्यात आला.



तहसीलदार सचिन डोंगरे, ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, गटविकास अधिकारी राणी फराटे, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी आणि अग्नीपंख फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय लाकुडझोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी तहसीलदार सचिन डोंगरे म्हणाले, की शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा हा यूपीएससी, एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीचा पाया आहे. गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य राखले, तर भविष्यात उच्चपदस्थ अधिकारी होण्याची मोठी संधी आहे. शिक्षकांनी स्वतः वाचन करून ज्ञानात भर घालावी आणि विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञान कसे देता येईल, यावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### सन्मानित विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा समावेश

यूपीएससीसाठी निवड झालेल्या सुशांत वडवकर, एनआयडीसाठी निवड झालेल्या प्रियदर्शिनी काकडे, न्यायाधीश शितल थोरात, वसुधा इथापे, हिताक्षी दरेकर, एनआयएफटीसाठी निवड झालेल्या ओम मोहिते, एअर फोर्ससाठी निवड झालेल्या काकडे तसेच एमपीएससी क्षेत्रातील सूरज घोडके, अभिजित वाळके, उमेश ढवळे, किरण जाधव, नीलम पवळे, रुपाली गोलांडे व अक्षय शिंदे आणि बँकिंग क्षेत्रासाठी निवड झालेल्या तेजस औटी यांच्यासह विविध क्षेत्रांत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस यांनी अग्नीपंख फाउंडेशनकडून विद्यार्थी आणि शाळांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य डी. डी. भुजबळ यांनी केले. यावेळी डॉ. उत्तम वडवकर, धर्मनाथ काकडे, एन. टी. शेलार, मधुकर सुपेकर, बापूसाहेब गायकवाड, मधुकर काळाणे, आबासाहेब जगताप, वर्षा भोयटे आणि शशिकांत पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुधीर साबळे व विजया शेलार यांनी केले, तर आभार प्रा. संजय लाकुडझोडे यांनी मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# गळक्या टँकरने पाथर्डी तालुक्याची तहान भागणार का?

## ६२ गावे, ३५१ वाड्यांसाठी ७४ टँकर । तब्बल १८ ते २० टँकर गळके असल्याचा दावा, दुष्काळी परिस्थितीवरून जनतेत संताप

■ **अनिल खाटेर**

● **पाथर्डी । वीरभूमी** –
नेते शुभेच्छा फलकांवर... अधिकारी दुष्काळी दौऱ्यावर... जनता पाण्यासाठी वाऱ्यावर... टँकरमधील पाणी रस्त्यावर... बळीराजा जनावरांच्या चाऱ्यासाठी वणवण! अशी संतप्त भावना तालुक्यातील दुष्काळग्रस्त जनतेतून व्यक्त होत आहे. तालुक्यात सध्या ६२ गावे आणि ३५१ वाड्यांसाठी ७४ टँकरच्या माध्यमातून १५७ खेपा केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात अनेक भागांतील नागरिकांची तहान भागत नसल्याचे चित्र आहे. पांढरीपुल, राक्षी आणि अमरापूर येथे पाणीपुरवठ्याचे स्रोत असले, तरी माणशी मंजूर पाणीवाटप आणि प्रत्यक्ष मिळणारे पाणी यामध्ये मोठी तफावत असल्याची तक्रार आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्रशासनाच्या नियमित बैठका आणि आढावा बैठका सुरू आहेत. कागदोपत्री सूचना दिल्या जात आहेत, निर्णय आणि आश्वासनांची नोंद होत आहे; मात्र प्रत्यक्षात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना टँकर सुरू असूनही नागरिकांची तहान भागत नसल्याची परिस्थिती आहे. दुष्काळाच्या गांभीर्यावर ठोस उपाययोजना करण्याऐवजी केवळ कागदी सूचना आणि बैठका सुरू राहिल्या, तर प्रश्न सुटणार कसा, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

दुष्काळामुळे घरात धान्याची चिंता निर्माण झाली आहे. गेल्या दोन वर्षांत शेतात चाऱ्याची गंज रचली गेलेली नाही. फळबागा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. जनावरांच्या चाऱ्यासाठी आता मोठ्या प्रमाणावर उसाच्या वाढ्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. चाऱ्यासाठी उसाची तोड वाढल्याने साखर कारखान्यांनीही ऊसतोडीसाठी धावपळ सुरू केली आहे. ऊस उत्पादकांच्या मागे कारखानदारांकडून ऊस मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

कोरोना काळ वगळता नवरात्रोत्सवाच्या काळात मोहटादेवी गडावर भाविकांची गर्दी कधीही कमी झालेली दिसली नव्हती. मात्र यंदा इतर वर्षांच्या तुलनेत भाविकांची संख्या कमी असल्याचे चित्र आहे. व्यापारी, शेतकरी, मजूर आणि कष्टकरी अशा सर्वच घटकांवर दुष्काळाचा परिणाम जाणवत आहे.

शासनाकडून शुभेच्छा फलक आणि सत्कार समारंभ टाळण्याबाबत आवाहन केले जाते. मात्र प्रत्यक्षात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा फलक, वाढदिवसाचे फलक आणि स्वागत कमानी मोठ्या प्रमाणावर उभारल्या जात आहेत. पदरचे पैसे खर्च करून कमानी उभारल्या जात असल्या, तरी ज्या जनतेच्या पाठिंब्यावर नेतृत्व आणि सार्वजनिक जीवन उभे आहे, ती जनता दुष्काळाने त्रस्त असताना नेते व त्यांच्या समर्थकांनी मोठमोठ्या फलकांवरील हसरे फोटो टाळावेत, अशी भावना व्यक्त होत आहे.

पालिकेकडून किती फलक आणि कमानींना परवानगी देण्यात आली, याबाबत संबंधित कर्मचारी स्पष्ट माहिती देत नसल्याची तक्रार आहे. वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने फलक लावले जात असल्याने अपघात झाल्यानंतरच कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. राज्य शासनाची मनाई असतानाही विजेच्या खांबांवर फलक लावले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बाहेरगावी स्थायिक झालेले भूमिपुत्रही शहरात फलक लावून शुभेच्छा देत आहेत. तहसील कार्यालयातून बैठकीसाठी गावांकडे जाताना अधिकाऱ्यांच्या निदर्शनास असे फलक येत नसतील का? त्यांच्यावर कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिक विचारत आहेत.



सत्कार समारंभ आणि वाढदिवसाचे कार्यक्रम टाळण्याचे आवाहन करणाऱ्या नेत्यांनी उत्साही कार्यकर्त्यांनाही आवर घालण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. समाजमाध्यमांवर दुष्काळी दौऱ्यांच्या वेळी बळीराजाच्या व्यथा पाहून भावूक होणारे काही नेते आणि त्याच वेळी शुभेच्छा फलकांवर हसताना दिसतात. त्यामुळे नेमका कोणता चेहरा खरा मानायचा, असा प्रश्न सामान्य जनतेतून उपस्थित होत आहे.

यंदाची दुष्काळी परिस्थिती गंभीर होत असताना सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तू पुरविण्याबाबत अद्याप ठोस हालचाली झालेल्या नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. सणासुदीचे दिवस सुरू झाले आहेत. रेशन कार्ड काढण्यासाठी नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडेही प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब सोन्यापेक्षाही महाग असल्याची जाणीव केवळ भाषणातून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजे, अशी मागणी होत आहे.

तालुक्यात सुरू असलेल्या ७४ टँकरपैकी किमान १८ ते २० टँकर गळके असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत आहे. तालुक्यातील बहुतांश रस्ते चढ-उताराचे आहेत. भरलेला टँकर चढ चढताना दाबामुळे पाणी गळते, तर सपाट रस्त्यावर खड्ड्यांमधून धक्के बसल्यानेही टँकरमधील पाणी सतत गळत असल्याचे सांगितले जाते. परिणामी नागरिकांसाठी पाठविलेले पाणी रस्त्यावरच वाया जात असल्याची तक्रार आहे.

पाणीवाटपासाठी गावपातळीवर उभारण्यात आलेल्या यंत्रणेचीही कठोरपणे तपासणी करण्याची गरज आहे. आगामी जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुका डोळ्यासमोर ठेवून टँकरच्या पाण्याबाबत कोणी राजकारण करत असेल, तर प्रशासनाने त्याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

तालुक्यातील आठवडे बाजारांवरही दुष्काळाचे सावट आहे. दैनंदिन बाजारपेठेच्या तुलनेत आठवडे बाजारातही गर्दी कमी होत आहे. रखरखत्या उन्हात दिवसभर विक्रेते बसूनही त्यांचा संपूर्ण माल विकला जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे व्यापारी वर्गावरही आर्थिक संकट ओढवले आहे.

दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, चारा संकट, बाजारपेठेतील मंदी आणि प्रशासनाकडून अपेक्षित वेगाने उपाययोजना होत नसल्याच्या तक्रारी यामुळे तालुक्यात असंतोष वाढत आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास जनतेतील नाराजी तीव्र होऊ शकते. प्रशासनाने केवळ बैठका आणि कागदी सूचनांवर न थांबता पाणी, चारा, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि टँकर व्यवस्थापनाबाबत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# मतदारसंघात टँकर, चारा छावण्या सुरू कराव्यात

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची आमदार काशिनाथ दातेंनी घेतली भेट

● **पारनेर । वीरभूमी**–
पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या दुष्काळी परिस्थितीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांची मुंबई येथे भेट घेऊन मतदारसंघातील जनतेच्या व्यथा आणि पाणीटंचाईचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. दुष्काळाच्या झळांनी सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि पशुपालक त्रस्त होत असताना जनतेला दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड उपस्थित होते.



पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, तसेच पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक असलेल्या इतर उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी आग्रही मागणी आमदार दाते यांनी यावेळी केली.

दुष्काळाचा फटका केवळ नागरिकांनाच नव्हे, तर पशुधनालाही बसत आहे. जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन करणे शक्य व्हावे आणि पशुपालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी चारा छावण्या किंवा चारा डेपो लवकरात लवकर सुरू करण्याची मागणीही त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.

> दुष्काळाच्या कठीण काळात नागरिकांना पिण्याचे पाणी आणि पशुधनाला चारा उपलब्ध करून देणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून ग्रामीण जनजीवन टिकवून ठेवण्याची गरज आहे. दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण जनजीवन यांचे प्रश्न अत्यंत संवेदनशील बनतात. अशा वेळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने वेळ न दवडता निर्णय घेणे आवश्यक आहे.
>
> **– आ. काशिनाथ दाते,** विधानसभा सदस्य

# कबड्डीच्या मैदानावर अभिनवचा दबदबा!

## १४, १७ व १९ वर्षांखालील मुलांच्या तिन्ही संघ विजयी । जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

● **अकोले । वीरभूमी**–
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत मारूतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, अकोलेच्या मुलांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत मैदानावर वर्चस्व गाजवले.



दि. १३ व १४ ऑक्टोबर २०२६ रोजी अगस्ती महाविद्यालय येथे झालेल्या या स्पर्धेत अभिनवच्या १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील मुलांच्या तिन्ही संघांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपदावर नाव कोरले. अचूक चढाया, भक्कम पकडी, आक्रमक खेळ आणि शेवटच्या क्षणापर्यंत विजयासाठी दिलेली झुंज यांच्या जोरावर तिन्ही संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत शानदार विजय मिळवला.

या दमदार कामगिरीच्या जोरावर तिन्ही विजेत्या संघांची आगामी शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे जिल्हास्तरावर अभिनवचे प्रतिनिधित्व करण्याची संधी या खेळाडूंना मिळाली असून, पुढील आव्हानासाठी तिन्ही संघ सज्ज झाले आहेत.

या यशामागे खेळाडूंना सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. अकोले तालुका कबड्डी असोसिएशनचे सचिव व क्रीडाशिक्षक सागर साळुंखे, तसेच आदिनाथ आभाळे आणि अश्विनी फापाळे यां

एकाच स्पर्धेत तीन वयोगटांत तीन विजेतेपदे मिळवून तिन्ही संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड होणे, ही अभिनवच्या क्रीडा क्षेत्रातील भक्कम वाटचालीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करणारी कामगिरी ठरली आहे.चे खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

अभिनवच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, सहसचिव तथा शाळेच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., कोषाध्यक्षा व वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, पर्यवेक्षक पराग सानप, उषा हासे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख स्मिता पुंड तसेच संस्थेतील सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद आणि क्रीडा विभागाने विजेत्या खेळाडूंसह मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# गुंजाळे ग्रामस्थ आणि सहकारी शिक्षकांकडून मोहिनी थिटे-सातपुते यांना हृद्य निरोप

## जिल्हा परिषद शिक्षिका मोहिनी थिटे-सातपुते प्रदीर्घ सेवेतून निवृत्त । सेवापूर्ती समारंभात शैक्षणिक योगदानाचा गौरव

● **अहिल्यानगर । वीरभूमी**–
अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या राहुरी तालुक्यातील गुंजाळे येथील जिल्हा परिषद शाळेतील अध्यापिका श्रीमती मोहिनी ज्ञानेश्वर थिटे-सातपुते या प्रदीर्घ सेवेनंतर नुकत्याच निवृत्त झाल्या. त्यानिमित्त गुंजाळे ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती आणि सहकारी शिक्षकांच्या वतीने आयोजित सेवापूर्ती समारंभात त्यांना हृद्य निरोप देण्यात आला.

श्रीमती मोहिनी थिटे-सातपुते या गेल्या साडेतीन वर्षांपासून गुंजाळे जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होत्या. त्यापूर्वी त्यांनी घोडेगाव (नेवासा), गजानन वसाहत, बोल्हेगाव (नगर) आणि लेकुरवाळी आखाडा (नेवासा) येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्वपूर्ण



कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलेले अनेक विद्यार्थी आज विविध चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांशी मिळून-मिसळून शिकविण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे त्या विद्यार्थ्यांच्या आवडत्या शिक्षिका बनल्या.

सेवापूर्ती समारंभात सरपंच गंगूबाई नवले आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व शिवाजी साठेमामा यांच्या हस्ते शिक्षिका मोहिनी थिटे-सातपुते आणि ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातपुते यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी संजय बोबडे, केंद्रप्रमुख लवांडे, केंद्रप्रमुख बाबा गोसावी आणि केंद्रप्रमुख वाकचौरे उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांनी मोहिनी थिटे-सातपुते यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकार्याचा गौरव केला.

आपल्या मनोगतात मोहिनी थिटे-सातपुते यांनी गुंजाळे जिल्हा परिषद शाळेच्या प्रगतीमध्ये ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक आणि सहकारी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

या समारंभाला शाळेतील विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन किरण रासकर सर यांनी केले, तर मुख्याध्यापिका शीतल शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून आभार मानले.